# मुंबई विद्यापीठ

## विद्यार्थी कल्याण विभाग

क्र. वि.क.वि./३९/२०१६

डॉ. सुनिल पाटील.
संचालक,

विद्यापीठ विद्यार्थी भवन,
'ब' पथ, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.

परिपत्रक :

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ करीता मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी राबविल्या जाणा-या [पुस्तकपेढी] उपक्रमास मिळणा-या विद्यापीठ अनुदानाविषयी.

---

महोदया/महोदय,

विद्यापीठ विभागातील विभागप्रमुख व विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयाचे/संस्थांचे प्राचार्य/संचालक/ अधिष्ठाता यांना कळविण्यात येते की मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागातर्फे वर नमूद केलेल्या योजनेखाली दर शैक्षणिक वर्षाकरीता अनुदानाची तरतूद केली जाते व त्यातून विद्यापीठ विभागात/महाविद्यालयात/संस्थेंत प्रवेश घेतलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार त्या विद्यापीठ विभागाने महाविद्यालयाने/ संस्थेने विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागाकडे तशी मागणी केल्यास पुस्तकपेढी योजनेखाली अनुदानित रक्कमेचे वाटप केले जाते.

उपरोल्लेखित विषयांतर्गत २०१६-२०१७ या शैक्षणिक वर्षाकरीता ज्या शैक्षणिक संस्थांना अनुदान घेण्याची इच्छा आहे त्यांनी अनुदान मिळण्याच्या दृष्टीने मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या माहितीचा सोबत जोडलेला तक्ता भरुन संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग यांच्याकडे **सोमवार, दिनांक ३१ ऑक्टोंबर २०१६** पर्यन्त किंवा त्याच्या अगोदर पाठविण्याची व्यवस्था करावी म्हणजे पुढील कार्यवाही करुन त्यासंबंधीच्या सल्लागार समितीने अनुदान मंजुर केल्यास सदर विद्यापीठ विभाग/महाविद्यालय/संस्थां त्यांच्या विद्यार्थी संख्येनुसार अनुदानाचे वितरण करण्याचे आदेश निर्गमित केले जातील.

ज्या विद्यापीठ विभागांना/महाविद्यालयांना/संस्थांना शैक्षणिक वर्ष २०१५-२०१६ करीता वरील योजनेखाली अनुदानाचे वितरण करण्यात आले होते त्या विभागांनी/महाविद्यालयांनी/संस्थांनी कृपया वितरीत झालेल्या अनुदानाचे २०१६-२०१७ चे लेखा अहवाल ताबडतोब पाठवावे अशी विनंती केली होती. शैक्षणक वर्ष २०१५-२०१६ किंवा त्यापूर्वीचे लेखा अहवाल या विभागास सादर केल्याशिवाय २०१६-२०१७ या शैक्षणिक वर्षासाठी अनुदान वितरीत करणे शक्य होणार नाही. याची संबंधीत विभागांनी/महाविद्यालयांनी/संस्थांनी कृपया नोंद घ्यावी.

सदर योजना विद्यापीठ विभागात/महाविद्यालयात/ संस्थांना राबविण्यासंबंधी मार्गदर्शक प्रणाली सोबत जोडली आहे. त्याची अंमलबजावणी करावी ही विनंती,

मुंबई - ४०० ०२०
दिनांक : ०४ ऑक्टोंबर,२०१६

(डॉ. सुनिल पाटील )
संचालक

प्रत : विद्यापीठ विभागाचे प्रमुख व संलग्नित महाविद्यालयाचे व संस्थेचे प्राचार्य/संचालक/अधिष्ठाता यांना त्यांच्या माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

मुंबई विद्यापीठ विभागातील/ महाविद्यालयातील/संस्थेतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणा-या पुस्तकपेढी उपक्रमास विद्यापीठ अनुदान मिळण्यासाठीचा अर्ज.

१. विभागाचे/महाविद्यालयाचे/संस्थेचे नांव व पत्ता : ----------------------------------------
----------------------------------------
----------------------------------------
----------------------------------------

२. विविध वर्गात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या व वर्गवारी :
----------------------------

| वर्गशाखा | अनुसुचित जाती | अनुसुचित जमाती | भटक्या जाती | भटक्या जमाती | एकूण विद्यार्थी १ २ ३ ४ |
|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | |
| | | | | | |

३. फक्त मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी विभागात/महाविद्यालय/संस्थेत सध्या राबवित असलेल्या योजनांची थोडक्यात माहिती :
४, तत्सम नवीन आलेल्या योजनांविषयी माहिती :
५, नवीन योजनांचा अपेक्षित भार :
६. विद्यापीठाकडून अपेक्षित असलेल्या आर्थिक सहाय्याची रक्कम :
७. आतापर्यन्त विद्यापीठाकडून वरील योजनेअंतर्गत मिळालेले आर्थिकसहाय :
८. महाविद्यालयाचा राष्ट्रीयकृत बॅंकेतील खाते क्र व नाव :..........................................................
--------------------------------------------------------------------------------

आर्थिक वर्ष रक्कम लेखा अहवाल दिला आहे का? होय/नाही

प्राचार्य / संचालक / विभागप्रमुख
सही व शिक्का

विशेष सुचना : ज्या विभागांना/महाविद्यालयांना/संस्थांना २०१५-२०१६ किंवा तत्पूर्वी अनुदान मिळाले असेल त्यांनी त्यांचा लेखा अहवाल वरील तक्त्याबरोबर पाठवावा ही विनंती. तसेच विद्यार्थ्यांच्या नावाची सुची सोबत जोडण्यात यावी.

# मुंबई विद्यापीठ
## विद्यार्थी कल्याण विभाग

## मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी पुस्तकपेढी योजना

१. मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी "मुंबई विद्यापीठ पुस्तकपेढी योजना" असे ठळक पणे नमुद करुन या परिपत्रकातील योजनेस प्रसिध्दी देण्यांत यावी.

२. "पुस्तकपेढी" योजना राबवताना या योजनेसाठी घटीत झालेल्या समितीने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार राबवण्याची जबाबदारी प्राचार्याची असेल.

३. ग्रंथालयात "पुस्तकपेढी" हा स्वतंत्र विभाग असावा.

४. विद्यापीठ विभागाने/महाविद्यालयाने या पुस्तकपेढी योजनेसाठी कोणतीही अनामत रक्कम अथवा शुल्क विद्यार्थ्यांकडून आकारु नये.

५. पुस्तके ठेवण्यासाठी वापरलेल्या पुस्तकांच्या मांडणीवर **मुंबई विद्यापीठ पुस्तकपेढी योजने अंतर्गत खरेदी केलेली पुस्तके** असे ठळक अक्षरात लिहावे. तसेच पुस्तके/मासिके/संदर्भ पुस्तके यावर **मुंबई विद्यापीठ पुस्तकपेढी योजने अंतर्गत खरेदी केलेली पुस्तके** असा शिक्का मारावा.

६. महाविद्यालय/विभागाने महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या/विभाग प्रमुखांच्या अध्यक्षतेखाली कमीत-कमी चार महाविद्यालय/विभागातील सदस्यांची समित गठीत करुन या योजनेची यशस्वी पणे अमंलबजावणी करावी.

७. पुस्तकपेढी साठी गठीत झालेल्या समितीने फक्त पुस्तकांचे वाटप न करता वारंवार गरजू विद्यार्थ्यांच्या भेटी घेऊन त्यांच्या अडचणी सोडवाव्यात व वर्षभरासाठी वेळापत्रक बनवुन सदरहू योजना राबवावी.

८. पुस्तक पेढी योजनेअतर्गत खरेदी केलेल्या पुस्तकांची यादी विद्यापीठांस सादर करण्याची जबाबदारी गठीत झालेल्या समितीची राहील. तसेच या योजनेसाठी खरेदी केलेल्या पुस्तकांची यादी वेगळया नोंदवहीत करावी. ही पुस्तके ग्रंथालयातील पुस्तकांमध्ये एकत्र करु नयेत.

९. तसेच समिती या योजनेच्या लाभार्थीची यादी विद्यापीठास सादर करेल (लाभार्थी मागासवर्गीय विद्यार्थ्यांची यादी.)

१०. नविन शैक्षणिक वर्षाच्या सुरवातीस सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यांत पुस्तकपेढी समितीने ही योजना कशी राबवली यांचा अहवाल पाठवावा.

११. या योजनेअतर्गत खरेदी केलेल्या वस्तु ही विद्यापीठाची मालमत्ता असेल व महाविद्यालयाचे प्राचार्य/विद्यापीठाचे विभाग प्रमुख हे विश्वस्त असतील.

१२. पुस्तकपेढी योजनेअतर्गत मिळालेल्या निधीचा उपयोग पुढील प्रमाणे करण्यांत यावा. ६०% निधी पुस्तक खरेदी करण्यासाठी वापरावा. २०% निधी समुपदेशन वर्ग आणि ग्रंथालय परीक्षण करणा-या शिक्षकांच्या मानधना पोटी. १०% निधी संदर्भीय पुस्तकांसाठी आणि १०% निधी पुस्तके/ग्रंथ ठेवण्याच्या मांडणी खरेदीसाठी.(जर अत्यावश्यक असल्यास)

१३. ज्या विद्यापीठ विभागांना विद्यापीठ अनुदान मंडळाकडून पुस्तक खरेदी करण्यासाठी जर निधी मिळाला असेल तर तो सर्व प्रथम खर्च करावा व त्यानंतर गरज भासल्यास मुंबई विद्यापीठ पुस्तकपेढी योजनेचा लाभ घ्यावा.

१४. सदरहू निधीचे व लेखापरीक्षित अहवाल संचालक विद्यार्थी कल्याण विभाग, वि.वि.भवन, 'बी' पथ, चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०, यांना जानेवारी अखेरपर्यंत मिळणे आवश्यक आहे व लेखा परीक्षक अहवाल आर्थिक वर्ष पूर्ण होण्यापूर्वी म्हणजेच ३१ मार्च पूर्वी मिळणे आवश्यक आहे. प्राचार्य/विभाग

## पुस्तकपेढी योजनेचा कार्य अहवाल

१. पुस्तकपेढी योजनेचा किती विद्यार्थ्यांना लाभ मिळाला ?
   अ. पुस्तकांचे संच
   ब. संदर्भीय विभाग
   क. मासिकांची वर्गणी (periodicles/journals)
२. लाभ झालेल्या विद्यार्थ्यांपैकी किती विद्यार्थी विद्यापीठ परीक्षेस बसले
३. लाभ झालेल्या विद्यार्थ्यांपैकी किती विद्यार्थी उत्तीर्ण झाले
४. पुस्तकपेढी योजनेसाठी गठीत झालेल्या महाविद्यालयीन समिती व विद्यार्थी यांच्यात किती वेळा बैठका झाल्या. (बैठकांचे अहवाल जोडावे)
५. समुपदेशनासाठी कोणत्या पध्दती अवलंबण्यात व सुचविण्यात आल्या.
६. कोणता विषय जास्त कठीण वाटला.
७. अध्यक्ष, पुस्तकपेढी समिती, समिची कार्यपध्दती या सगळयांचा सविस्तर निर्धारण अहवाल योग्य त्या सुधारणांसाठी सुचित करण्यांत याव्यात.
८. शैक्षणिक वर्षासाठी खरेदी केलेली पुस्तके/संपादकीय लेख/वस्तू.

--------------------------------